# हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड

## प्रेसनोट दि.२२/०६/२०२३

## २४ तासाचे आत खुनाच्या गुन्हयातील मुख्य आरोपीस अटक

हिंजवडी पोलीस स्टेशन येथे प्रेमबहादुर करण थापा वय ४० वर्षे रा.राजु दगडे चाळ, पाटीलनगर, बावधन, पुणे यास दि. १९/०६/२०२३ रोजी सायंकाळी ०५/०० ते दि. २१/०६/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. चे दरम्यान ई स्क्वेअर बिल्डिंग पाठीमागे असणाऱ्या वॉलकंपाऊंड लगत असणारे म्हसोबा मंदीराजवळ, रामनगर, बावधन, पुणे या ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी कशाचेतरी सहायाने डोक्यावर मारहाण करुन गंभीर जखमी करुन जिवे ठार मारुन खुन केलेबाबत मयताची पत्नी अंजली प्रेमबहादुर थापा यांनी दिले फिर्यादीवरुन हिंजवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ७४०/२०२३ भा दं वि कलम ३०२ प्रमाणे अज्ञात इसमाविरुध्द खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपींचा शोध घेण्याकरिता हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर यांनी हिंजवडी पोलीस स्टेशन तपास पथकाचे सपोनि काटे व सपोनि गोमारे यांचे नेतृत्वाखाली दोन पथके तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करुन वेगवेगळया ठिकाणी तपासाकरिता रवाना केले. अज्ञात आरोपीचा शोध घेत असताना **पोशि २४०१ ओम कांबळे** यांना त्यांच्या गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मयत व त्याचा आणखी एक साथीदार हे मागील तीन-चार दिवसांपासुन घटनास्थळाच्या आजुबाजुच्या परिसरात फिरत होते. व घटनास्थळी असलेल्या म्हसोबा मंदीराजवळ झोपत होते. मयत प्रेमबहादुर याचा साथीदार हा दि. २०/०६/२०२३ रोजी दुपारपासुन गायब झालेला असुन तो बावधन येथील स्मार्टटेक सेफ्टी सोल्युशन प्रा. लि. या कंपनीत कामास आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने तो काम करित असलेल्या नमुद कंपनीत जावुन माहिती घेतली असता त्याचे नाव अनिलकुमार राई असे असुन पत्ता व मोबाईल क्रमांकाची माहिती मिळाली. प्राप्त मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केले असता तो कोंढवा परिसरात असल्याची माहिती मिळाली.

त्याच्या आधारे कोंढवा परिसरात जावुन नेपाळी रहात असलेल्या ठिकाणी संशयित अनिलकुमार याचा फोटो दाखविला असता तो या ठिकाणी येत असल्याबाबत माहिती मिळाली व तो दि. २१/०६/२०२३ रोजी दुपारी आझादनगर कोंढवा येथील त्याचे नातेवाईकाकडे आला होता व तो वानवडीतील त्याच्या नेपाळी मित्राकडे गेला असल्याबाबतची माहिती मिळाल्याने वानवडीतील नेपाळी वस्तीत त्याचा शोध घेतला असता तो संविधान चौक वानवडी या ठिकाणी येणार असल्याची माहिती मिळाल्याने संविधान चौक, वानवडी येथे सापळा रचुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **अनिलकुमार राई वय ३३ वर्षे रा. रुबी हॉल क्लिनिकजवळ, आझादनगर, वानवडी, पुणे** असे असल्याचे सांगितले.त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता तो व मयत हे एकत्र भंगार गोळा करुन ते विकुण त्यातुन मिळालेले पैसे हे मयत प्रेमबहादुर याने एकटयाने घेतल्याने त्यातील हिस्सा सदर आरोपीस देण्यास नकार दिल्याने त्याचा राग मनात धरुन मयताचे डोक्यात दगड घालुन त्याचा खुन केल्याचे कबुल केले आहे. तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आणखीन दोन संशयीत साथीदार नामे १) रंजन सुधीर बिशु वय ४८ वर्षे रा. रानवारा जवळ, फुटपाथवर, बावधन, पुणे २) रतनसिंग मनोहरसिंग चौहान वय ६५ वर्षे रा. एआरडी कॉलनी, बावधन, पुणे यांनाही ताब्यात घेतले असुन दाखल गुन्हयाचा अधिक तपास पोलीस उप निरीक्षक यशवंत साळुंके हे करित आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. डॉ. श्री संजय शिंदे सो, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी सो, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ. श्री. काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. विशाल हिरे सो, सहायक पोलीस आयुक्त वाकड, विभाग, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शनखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर, सुनिल दहिफळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सोन्याबापु देशमुख, पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे प्रमुख सपोनि सागर काटे, सपोनि राम गोमारे, पोउनि यशवंत साळुंके, पोलीस अंमलदार बंडु मारणे, बाळकृष्ण शिंदे, योगेश शिंदे, बापुसाहेब धुमाळ, कुणाल शिंदे, कैलास केंगले, अरुण नरळे, रितेश कोळी, श्रीकांत चव्हाण, चंद्रकांत गडदे, नरेश बलसाणे, कारभारी पालवे, दत्ता शिंदे, अमर राणे, ओमप्रकाश कांबळे, सुभाष गुरव व परिमंडळ २ कार्यालयातील सागर पंडीत यांनी केली आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,परि-२
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड